## महाराष्ट्र शासन

क्र.एफएलडी-१५२१/ प्र.क्र.२३३/ फ-१०

E-mail: deskf10.rfd-mh@gov.in

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक : ०७.०१.२०२२

**प्रति,**

अपर मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर
मुख्य वनसंरक्षक (प्रा.), नाशिक

**विषय: वनजमीन- नाशिक**
प्रवाही वळण योजनेकरिता मौ. ननाशी, ता. दिंडोरी, जि. नाशिक येथील ३.४८ हे. वनजमीन वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वळती करणेबाबत

**संदर्भ:** केंद्रस्थ अधिकारी यांचे पत्र क्र. Desk-१७/ Nodal/ Nashik / I.D.१२९१३/ १५९४/२०२१-२२, दि.२२.११.२०२१

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये प्रवाही वळण योजनेकरिता मौ. ननाशी, ता. दिंडोरी, जि. नाशिक येथील ३.४८ हे. वनजमीन वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वळती करणेबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने खाली मुद्यांबाबतचे स्पष्टीकरण शासनास सादर करावे:-

१) प्रस्तावित वनजमीन वळतीकरणामुळे वनजमिनीचे ४-५ तुकडे पडतात. सदर तुकड्या तुकड्यातील वनजमिनीचे संवर्धन, संरक्षण व व्यवस्थापन करण्यास अडचणी उद्भवणार नाहीत काय या?

२) पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित करण्यात आलेली जमीन डोंगराळ व मध्यम उताराची असल्याचे नमूद केले आहे. Kml File च्या निरिक्षणावरून सदर क्षेत्र जास्त उताराचे असल्याचे दिसून येते. सबब, मुख्य वनसंरक्षक (प्रा.), नाशिक यांनी स्थळ पाहणी करून सदर क्षेत्र पर्यायी वनीकरणासाठी योग्य आहे किंवा कसे ?

३) कालव्याची लांबी व रूंदी नमूद करणे आवश्यक आहे.

४) प्रस्तावित ठिकाणी वन्यजीवांचा वावर असल्याचे उपवनसंरक्षक यांच्या अहवालात नमूद आहे. त्यामुळे त्यांच्या मुक्त संचारासाठी प्रस्तावित कालव्यावरून रस्त्यांची व्यवस्था करण्यात आली आहे किंवा कसे?

(गणेश जाधव) 10/1/22
अवर सचिव, महाराष्ट्र शासन